**जनसंपर्क अधिकारी**
**पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in

**प्रेसनोट क्रमांक :- २५३** **दिनांक :- १३/०९/२०२१**

## प्रतिबंधीत असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखु असा एकुण ६,७४,४७८/-रु. किंमतीचा माल जप्त करुन साठवणुक व विक्रीकरीता बाळगणारे २ ईसमांवर अंमली पदार्थ विरोधी कक्षाची कारवाई-

अंमली पदार्थ विरोधी कक्ष यांना दिनांक ११/०९/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत खात्रीशीर माहिती प्राप्त झाली की, नालासोपारा (पुर्व), आचोळे रोड येथील डॉन लेन मधील एका किराणा दुकानचालकाने त्याचे किराणा दुकानात प्रतिबंधीत केलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखु असा माल विक्रिरीता साठवणुक करुन ठेवलेला आहे.

सदर मिळालेल्या बातमीचा आशय वरिष्ठांना कळवून त्यांचे सुचना व मार्गदर्शनाप्रमाणे छापा कारवाई करण्यात आली. सदर कारवाईचे दरम्यान किराणा दुकानदार जुबेर अहमद मुशरफ हुसेन पटेल याचे किराणा दुकानातून महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधीत केलेला व मानवी जिवीतास अपायकारक असलेला गुटखा, पानमसाला व सुगंधित तंबाखु असा ५१८४०/-रु. किंमतीचा मुद्देमाल तसेच स्वीटी हाउस वेल्फेयर सोसायटी या बिल्डींग मधील रुम.क्र. ००१ मधुन तसेच स्वीटी हाउस चाळी मधील रुममधुन ६,२२,६३८/-रु. किंमतीचा असा एकुण ६,७४,४७८/-रु. किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन जुबेर अहमद मुशरफ हुसेन पटेल व सदरचा माल विक्री करणारा ईसम नवाजीस उस्मान अन्सारी यांचेविरुध्द तुळींज पोलीस ठाणे येथे गुन्हा नोंद क्र. ।। ११४०/२१ भा.दं.वि.सं. कलम ३२८, २७२ सह अन्न व सुरक्षा मानके अधियिम प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन नमुद २ आरोपींना गुन्हयात अटक करण्यात आली असून पुढील तपास चालु आहे.

सदरची कारवाई डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. रामचंद्र देशमुख, सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली अंमली पदार्थ विरोधी कक्षाचे पोलीस निरीक्षक, श्री. देवीदास हंडोरे, सपोनि. विलास कुटे, मसपोनि. तेजश्री शिंदे नेम-भरोसा सेल, पोना.२५४ पवन पाटील, पो.शि.३२५८ ज्ञानेश्वर चव्हाण, पोशि.१२०४ विष्णुदेव घरबुडे, तसेच सफौ. बी. डी. चित्ते, पो.हवा.११८० बी. एम. पवार नेमणुक-अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, नालासोपारा विभाग यांनी केली आहे.

---ooo---